# नाट्यकला रुजविण्याचा प्रयत्न करणार

## नाट्यकर्मी अभय जोग | हरमल नाट्यप्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २५ :** पेडणे तालुक्यात नाट्य कलेचे उपासक भरपूर आहेत. राज्यभरात अडीच हजार नाटके हौशी रंगभूमीवर होत असतात. त्या नाटकाचा गुणात्मक विचार केल्यास आपण खूप मागे पडतो आहोत. सिद्धेश्वर संस्थेने अनुरूप कार्य व उपक्रम राबवून नवोदितांत गुणात्मकता रुजविण्याचा प्रयत्न चालविला त्याबद्दल अभिनंदन असल्याचे, प्रतिपादन ज्येष्ठ नाट्यकर्मी अभय जोग यांनी केले.

येथील सिद्धेश्वर संस्था आयोजित नाट्य प्रशिक्षण शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पत्रकार चंद्रहास दाभोलकर, संस्थेचे अध्यक्ष संजय मयेकर उपस्थित होते. पेडणे व सत्तरी तालुक्यातील संस्कृती प्रेमी मंडळींना नाटकाबद्दल प्रचंड अभिमान व स्वाभिमानी असतात. शिबिर म्हणजे साखळी, जी गुंफलेली आहे. आम्ही प्राप्त केलेली कला, तुमच्या पर्यंत पोचणार व तुमच्याकडून पुढील पिढीला जाईल, ज्योतीने ज्योत पेटवण्यासारखे आहे.

अलीकडे नाटकाची आवड वाढत आहे. मात्र प्रत्येकाकडे वेळ कमी, मात्र पैसे आहेत. प्रेक्षकांची रुची बदलत असून, त्यांना हसण्याची, टिंगल व विनोद असलेली नाटके आवडू लागली आहेत. ती व्यावसायिक नाटके आहेत. मात्र आपण नाट्य कलेला जोपासताना गुणात्मक पद्धतीने बदल आत्मसात करूया. नाट्यकला टिकवून ठेवूया व वृद्धिंगत करण्याचा संकल्प करूया, असे मनोगत नाट्यकर्मी अभय जोग यांनी केले.





**हरमल : नाट्य प्रशिक्षण शिबिराचे उद्‌घाटन करताना चंद्रहास दाभोलकर. सोबत नाट्यकर्मी अभय जोग, संजय मयेकर व उद्देश पेडणेकर.**

हरमल गावात वर्षभरात १४-१५ नाटकाचे सादरीकरण होते.त्या नाटकात सहभागी अनुभवी कलाकारांना तसेच नवोदितांना प्रोत्साहन व बळ देण्यासाठी, नामवंत प्रशिक्षकाकदून मार्गदर्शन देण्याचा उपक्रम फारच स्तुत्य आहे, त्याबद्दल अभिनंदन आहे. व्यवसायाने नाट्य शिक्षक असलेल्या संजय मयेकर यांनी शिबिरार्थींना घेऊन नाट्यनिर्मिती करण्याचा त्याचा प्रयत्न सफल होवो, असे मत पत्रकार चंद्रहास दाभोलकर यांनी व्यक्त केले.

सिध्देश्वर संस्थेचे कार्य थिएटर्स, संगीत, नृत्य व योगा क्षेत्रात कार्यरत राहण्याचा प्रयत्न आहे. प्रशिक्षणार्थी व अन्य कलाकार हेरून नाट्य निर्मिती करण्याचा प्रयत्न आहे. साचेबद्ध नव्हे तर वेगळ्या प्रकारे मात्र रसिकांना नक्की आवडेल अशी कृती दाखवण्याचा प्रयत्न आहे. ऐतिहासिक 'इथे ओशाळला मृत्यू' नाटक पडद्या ना सुट्टी देत सादर केले व गावातील रसिकांनी स्वीकारले, हे आपल्यासाठी खास होते, असे संजय मयेकर यांनी सांगितले.

प्रारंभी नाट्यकर्मी अभय जोग यांनी दीपप्रज्वलन केले. कलाकार महेश गोकर्णकर यांनी मान्यवरांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सूत्रनिवेदन उद्देश पेडणेकर यांनी तर संजय मयेकर यांनी आभार मानले. या शिबिरात ४२ जणांनी सहभाग घेतला होता.

---



डिचोली : अक्रेलिक पेंटिंग स्पर्धेतील विजेत्यांसोबत आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये. बाजूला सम्राट क्लबचे पदाधिकारी. (विशांत वझे)

## सम्राट क्लब डिचोलीतर्फे अक्रेलिक पेंटिंग स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साहिल पेडणेकर प्रथम, शुभम गावडे द्वितीय**

**डिचोली, दि. २५ :** कला क्षेत्रातील विद्यार्थ्यांना व कला प्रेमींना ऍक्रेलिक पेंटिंगच्या माध्यमातून आपले चित्र रेखाटण्याची संधी देताना डिचोली सम्राट क्लबने ऍक्रेलिक पेंटिंग स्पर्धेच आयोजन येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या व्यासपीठावर केले होते. आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांच्याहस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

यावेळी अध्यक्ष अविन नाईक, प्रसाद नाईक, अमोल बेतकीकर, डिचोली सम्राट अध्यक्ष राहुल कवळेकर, गोपाळ मोरजकर, भारत चणेकर, परीक्षेत राजमोहन शेट्ये, प्रमोद गावकर आदी उपस्थित होते. चित्रकार हा सतत नाविन्याचा ध्यास, विविध अशा स्वरुपात आपले चित्र रेखाटतो. युवाशक्तीला व कलाकारांना अशा प्रकारच्या संधी देणे गरजेचे असून त्यातून त्यांच्या उपजत प्रतिभेला चालना मिळण्यास मदत होते असे डॉ. चंद्रकांत शेट्ये यांनी सागितले. या स्पर्धेत साहिल पेडणेकर याला पहिले, शुभम गावडे दुसरे, प्रतिक च्यारी तिसरे, नितेश तेंडुलकर व शशांक शिरसाट यांना उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले.

---

## पेडणेतील सुर्यवंशी यांचे अमृतसर येथे जादूचे प्रयोग

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २५ :** पेडण्यातील चित्रकार, जादूगार पी. ए. सूर्यवंशी हे वीणा वर्ल्डच्या सहलीनिर्मित दौऱ्यावर असून, त्यांनी अमृतसर राज्यात ५५९वा प्रयोग केला. उत्पंनाचे पाच हजार रुपये लोकविश्वास प्रतिष्ठान, ढवळी फोंडा, विशेष मुलांच्या मदती करीता पाठवण्यात आल्याची माहिती दिली.

सदर प्रयोग डी. एन.आर. प्राईड हॉटेल, अमृतसर येथे केला व उपस्थित पर्यटकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सूर्यवंशी गेली ४० वर्षे वेगवेगळ्या शैक्षणिक संस्थांसाठी टाकाऊतून टिकाऊ व प्रबोधनात्मक जादूचे प्रयोग सादर करतात. काही प्रयोग मुलांना शिकवतात. प्लास्टिकचा कमीतकमी उपयोग का करावा, जुन्या टाकाऊ वस्तूंपासून खेळणी करणे, करवांट्यापासून उपयुक्त वस्तू कशा बनवाव्यात याबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी मुंबईचे सचिन टिकेकर यांनी सूर्यवंशी यांची ओळख केली. तर सहलीचे मार्गदर्शक किशोर तावडे यांनी आभार मानले.



**अमृतसर : जादूचे प्रयोग सादर करताना जादूगर पी. ए. सूर्यवंशी.**

---

## प्रक्रिया सुधारणा महत्त्वाच्या : संजीव सन्याल

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २५ :** प्रक्रिया सुधारणा (प्रोसेस रिफॉर्म) या नट आणि बोल्ट सुधारणा होत्या. त्या आपल्या देशाच्या जलद आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण होत्या.



इंटरनॅशनल सेंटर गोवाच्या (आयसीजी) सार्वजनिक व्याख्यानमालेचा एक भाग म्हणून बुधवारी संध्याकाळी आयसीजी येथे सार्वजनिक धोरण म्हणून प्रक्रिया सुधारणा: सरकारमध्ये बदल कसे करावे या विषयावर संन्याल बोलत होते.

संन्याल म्हणाले की, जर भारतीय अर्थव्यवस्था सातत्याने ८ टक्क्यांच्या वार्षिक दराने वाढत असेल, तर ते विद्यमान सरकारने सुरू केलेल्या प्रक्रिया सुधारणांच्या मालिकेमुळेच आहे.

२०१७-२२ दरम्यान केंद्रीय अर्थमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार म्हणून काम केलेले सन्याल म्हणाले की प्रक्रिया सुधारणांमुळे यंत्रणा घट्ट होण्यास मदत झाली आणि कार्यक्षमता वाढली.

प्रक्रिया सुधारणांचा वापर करून प्रशासकीय सुव्यवस्थित करण्याच्या प्रकरणाचा दाखला देत, सन्याल म्हणाले की, आता फक्त ९० दिवसांत कंपनी बंद करणे शक्य आहे, जिथे पूर्वी ४९९ दिवस लागायचे. त्याचप्रमाणे, नियमन क्षेत्रातील जुने कायदे बंद केल्यामुळे २०२१ पासून कोणत्याही कायदेशीर दबावाशिवाय लोकांना घरातून काम करण्यास मदत झाली.

सन्याल यांच्या म्हणण्यानुसार, २००९ च्या वजनमाप कायद्यातील बदलांमुळे वजन आणि मापांच्या क्षेत्रातील अतिरिक्त गुन्हेगारी परिणाम बंद करण्यात मदत झाली. बौद्धिक संपदा अधिकार (आय पी आर) विभागातील कर्मचाऱ्यांच्या वाढीमुळे २०२३-२४ मध्ये विक्रमी एक लाख पेटंट्स जारी करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

सन्याल यांनी असेही सांगितले की, अनेक अनावश्यक किंवा काम न करणारे सरकारी विभाग बंद केले गेले आहेत, ज्यामुळे कार्यक्षमता वाढली आहे.

---



**केरी - फोंडा : सहभागी मुलांसोबत मंत्री गोविंद गावडे, कांचन केरकर, अनिशा गावडे, सरिता नाईक व प्रियांका थाणेकर.**

## केरी-फोंडा येथे उन्हाळी शिबिर उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. २५ :** केरी - फोंडा येथे आयोजित केलेले उन्हाळी शिबिर नुकतेच केरी येथील ग्रामपंचायतीच्या सभागृहात उत्साहात झाले. सदर शिबिर अनिशा गावडे यांच्या पुढाकाराने मातृभूमी सेवा प्रतिष्ठान यांच्या सहकार्याने आयोजित केले होते. शिबिरात एकूण ५५ मुले सहभागी झाली.

या शिबिरात सरिता नाईक व प्रियांका थाणेकर यांनी मुलांना कला, क्राफ्ट, व्यायाम, संगीत, नृत्य इत्यादी संबंधी मार्गदर्शन केले. समारोप सोहळा कला व संस्कृती मंत्री गोविंद गावडे,पंच कांचन केरकर, आयोजक अनिशा गावडे, सरिता नाईक व प्रियांका थाणेकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.मंत्री गोविंद गावडे यांच्या हस्ते सर्व सहभागी मुलांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देण्यात आल्या.सूत्रनिवेदन प्रसन्ना नाईक यांनी केले तर शेवटी अनिशा गावडे यांनी आभार मानले.यानंतर मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

---

## 'नेचरमाईल्स अवेअरनेस वॉक'सह उत्तर गोव्यात स्वच्छता मोहीम

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २५ :** आंतरराष्ट्रीय जैविक विविधता दिनानिमित्त वनअर्थ फाऊंडेशनतर्फे 'नेचरमाइल्स अवेअरनेस वॉक' हा निसर्गाशी सखोल संबंध जोडण्यासाठी आणि पर्यावरणीय उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी डिझाइन केलेला मनोरंजक शैक्षणिक उपक्रम बुधवारी पार पडला.

उत्तर गोव्यात पक्षीप्रेमी आणि निसर्गप्रेमींसाठी जणू स्वर्ग असलेल्या निसर्गरम्य भाटी तलाव येथे २२ रोजी सकाळी ७ ते १० या वेळेत आयोजित उपक्रमात अनेक निसर्गप्रेमींनी सहभाग नोंदवला. भाटी या मनमोहक गावात भातशेतीने वेढलेले 'भाटी तलाव' विविध पक्ष्यांच्या प्रजातींना आकर्षित करते. तसेच गोव्याची समृद्ध जैवविविधता आणि नैसर्गिक



**भाटी: स्वच्छाता मोहिमेत सहभागी झालेले निसर्गप्रेमी.**

परिसंस्थेचे संरक्षण करण्याच्या महत्त्वाबद्दल जागरुकता निर्माण करते. 'वनअर्थ फाऊंडेशन'चे प्रकल्प सहायक तथा वनस्पतिशास्त्र पदवीधर आणि पक्षीप्रेमी एडन फोन्सेका यांनी या वॉकचे नेतृत्व केले. या उपक्रमाद्वारे विविध पार्श्वभूमी असलेल्या लोकांना बाटीम तलावाच्या नैसर्गिक सौंदर्याचा अनुभव घेणे, स्थानिक वनस्पती आणि प्राण्यांचे निरीक्षण करणे, समविचारी व्यक्तींसह गोव्याच्या समुद्रकिनाऱ्यांच्या पलीकडे असलेल्या पर्यावरणाचा सखोल अभ्यास करण्यासाठी एकत्र आणण्यात आले.पर्यावरणीय समतोल राखण्यात जैवविविधतेच्या महत्त्वाच्या भूमिकेवर भर देऊन 'नेचरमाइल्स वॉक'मध्ये सहभागी व्यक्तींना नैसर्गिक अधिवासात कचऱ्याचे परिणाम समजून घेण्यासाठी आणि अधिक शाश्वत वर्तनाकडे वळण्यास प्रोत्साहन देण्यासाठी बाटीम तलावाभोवती स्वच्छता मोहीमही राबवण्यात आली. हा उपक्रम संस्थेच्या जागरुकता वाढवणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि रिड्यूस, रियूज, रिपेअर, रिपेअर आणि रीसायकल या पाच रचनांचे पालन करण्याच्या उद्दिष्टांशी जोडण्यात आला.

'आपण निसर्गाचा भाग आहोत आणि निसर्गही आपला भाग आहे. कधीकधी आपण जीवनाच्या या सत्यापासून दूर जातो. म्हणूनच कधीकधी आपण जंगलाच्या हाकेला साद देतो आणि पृथ्वीच्या सौंदर्यात मग्न होतो, हे महत्त्वाचे आहे,' असे 'वनअर्थ फाऊंडेशन'चे संस्थापक आणि संचालक फर्डिन सिल्वेस्टर म्हणाले.

---





**पर्वरी : शववाहिका सुपूर्द करताना साई सर्व्हिसचे मनोज महाले. सोबत करण गोवेकर व इतर.** (शेखर वायंगणकर)

## साई सर्व्हिसतर्फे पिळर्ण पंचायतीला शववाहिका प्रदान

■ टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. २५ :** मार्रा पिळर्ण पंचायत क्षेत्रातील ग्रामस्थांच्या गरजेकरिता साई सर्व्हिस या वाहन आस्थापनातर्फे पिळर्ण पंचायतीला एक शववाहिका प्रदान करण्यात आली आहे.

साई सर्व्हिस आस्थापनाचे प्रमुख मनोज महाले यांनी हे वाहन पिळर्ण मार्रा पंचायत ग्राम विकास समितीचे निमंत्रक करण गोवेकर यांच्या सुपूर्द करण्यात आले. यावेळी ग्राम विकास समितीचे सदस्य जयवंत राणे, नारायण नागवेकर, सचिव पीटर मार्टिन्स उपस्थित होते. यावेळी करण गोवेकर यांनी आपल्या भाषणात साई सर्व्हिस आस्थापनाचे आभार मानताना पिळर्ण पंचायत ग्राम विकास समिती ग्रामस्थांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असून विविध उपक्रमातून पंचायत मंडळाच्या सहकार्याने विविध योज़ना राबवित आहोत असे सांगितले.

---

### निवडक



फोंडा : पालखी मिरवणुकीत सहभागी झालेले भाविक.

## नागेश महारुद्र संस्थानात वैशाखी पौर्णिमा उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २५ :** श्री नागेश महारुद्र संस्थान येथे भाटकर कुटुंबातर्फे वर्षपद्धतीनुसार वैशाखी पौर्णिमा हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा झाला. सकाळी ७ वाजता धार्मिक विधी अभिषेक, दुपारी १२.३० वाजता आरती तीर्थप्रसाद, संध्याकाळी ६.३० श्री. बोरकर आणि सचिन दाते यांच्यातर्फे भजनाचा कार्यक्रम झाला. रात्री ८.३० वाजता शिबिकोत्सव श्री नागेश महारुद्र, लक्ष्मीनारायण, गणपतीची पालखी. त्यानंतर महाआरती आणि फळफळावळींचा प्रसाद वितरण करण्यात आला. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने भाविक, महाजन, कुळावी, ग्रामस्थ आणि भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आसगाव येथे उद्या 'रायगडाला जेव्हा जाग येते'

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २५ :** मुणांगवाडा -आसगाव, रेडीसाळ, श्री दत्तात्रेय मंडप बार्देश येथील श्री दत्तात्रेय मंडपाच्या जीर्णोद्धाराप्रित्यर्थ सोमवार दि. २७ रोजी रात्री ९.३० वाजता श्री. शिवशंकर अनंत मयेकर व सौ. वनिता शिवशंकर मयेकर पुरस्कृत श्री देवी माऊली कला, क्रीडा आणि सांस्कृतिक मंडळ - मेणकुरे प्रस्तुत कै. प्रा. वसंत कानेटकर लिखित गणेश ठाकूर दिग्दर्शित व धर्मा नाईक निर्मित तीन अंकी महान ऐतिहासिक नाटक 'रायगडाला जेव्हा जाग येते' सादर केले जाईल.

या नाट्यप्रयोगाचे हेमंत नाईक, मनोज शेटये, अरुण नाईक, वसंत नाईक हे सहाय्यक दिग्दर्शक असून पार्श्वसंगीत - सत्यवान नाईक, रंगभूषा - नीळकंठ खलप, वेशभूषा - वर्षा ठाकूर, प्रकाशयोजना - पांडुरंग पांगम, ध्वनी संकलन - सुभाष शिरोडकर (श्री साई साऊंड सर्व्हिस - बांदा) तर रंगमंच व्यवस्था - दीपज्योती रंगमंच, अस्नोडा यांची आहे.

या नाट्यप्रयोगात नितीन नाईक, लक्ष्मी महात्मे सातोर्डेकर, प्रणव मिशाळ, श्रद्धा गवंडी, प्रशांत (शैलेश) नाईक, समीर नाईक, किरण कोरगावकर व निहीरा नाईक आदी कलाकार सहभागी होतील. तत्पूर्वी मंदिरात सकाळी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

## कामाक्षी आरोग्यधाम येथे १ जूनपासून बस्ती शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २५ :** गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय, शिरोडा येथील कामाक्षी आरोग्यधाम येथे १ जून ते ३० जून दरम्यान बस्ती शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

वर्षा ऋतूमध्ये होणारे संधिवात, आमवात, मणक्यांचे विकास व अन्य वातविकार टाळण्यासाठी तसेच उत्पन्न झालेले वातविकार नियंत्रित करण्यासाठी बस्ती हे श्रेष्ठ पंचकर्म आहे. नावनोंदणीसाठी कामाक्षी आरोग्यधाम येथे पंचकर्म विभाकडे सकाळी ९.३० ते दुपारी ४ यावेळेत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## तपोभूमीत बालसंस्कार शिबिरास सुरुवात

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २५ :** ब्राह्मानंद संस्कृत प्रबोधिनी तथा स्वामी ब्रह्मानंद वैदिक गुरुकुल अँड रिसर्च इन्स्टिटयूटच्या वतीने ३० रोजीपर्यंत श्री क्षेत्र तपोभूमी कुंडई येथे बालसंस्कार शिबिर होत आहे.

मुलांना लहान वयातच सुसंस्कारांचे धडे देणे हे प्रत्येक पालकाचे कर्तव्य आहे. आपली मुले लहान वयात मिळालेले संस्कार घेऊन आयुष्यभर सुसंस्कारी जीवन जगू शकतात. समाजात वाढत असलेले अनाथाश्रम आटोक्यात आणण्यासाठी अशा बालसंस्कार वर्गाची समाजाला गरज आहे. प्रत्येक पालकांने आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी अशा या बालसंस्कार वर्गात आपल्या मुलांना सहभागी केले पाहिजे. ब्रह्मेशानंद स्वामी यांचे स्वप्न हेच आहे की, प्रत्येक मनुष्य हा सुसंस्कारी, सुखी, समाधानी आणि ईश्वरी अधिष्टान आपल्या जीवनात प्राप्त करून जगला पाहिजे.

या शिबिरामध्ये स्तोत्र, पूजा, योग, सांस्कृत, पर्यावरण, इतिहास आदी विविध विषय शिकविण्यसााठी अध्यापन तसेच मुलांची संपूर्ण जबाबदारी सांभाळ्यासाठी होतकरू कार्यकर्ते उपस्थित आहेत.

तपोभूमी गुरुपीठात संपन्न झालेल्या या बालसंस्कार शिबिराचे उद्‌घाटन शुक्रवार दि. २३ रोजी सकाळी करण्यात आले, अशी माहिती आयोजकांनी दिली आहे.

## वेर्ला-काणका येथे आज वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २५ :** वेर्ला -काणका (गिरवडे) येथील श्री साखळेश्वर ब्राह्मण खाप्रेश्वर देवस्थानचा १४ वा वर्धापनदिन रविवार दि. २६ रोजी साजरा करण्यात येणार आहे.

यानिमित्त देवस्थानात सकाळपासून दत्ताराम पेडणेकर यांच्या यजमानपदाखाली विविध धार्मिक विधी होतील, दुपारी आरती, तीर्थप्रसाद व महाप्रसाद होणार आहे. संध्याकाळी किरण पेडणेकर यांच्या यजमानपदाखाली सत्यनारायण महापूजा होणार आहे. ७.३० वाजता शिवकृपानंद ग्रुप प्रस्तुत नाट्य व भक्तिसंगीताचा कार्यक्रम 'स्वर धारा' सादर होणार आहे.

## बांदोड्यात सेवा संस्थेचा आज 'कौटुंबिक मेळावा'

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २५ :** धोणशी बांदोडा येथील 'सेवा' या समाजिक संस्थेतर्फे रविवार दि. २६ रोजी सेवा कौटुंबिक मेळावा खांडेपार उसगाव येथील नागेशी वॉटर वर्ल्ड याठिकाणी आयोजित केला आहे. सकाळी १० वाजता होणाऱ्या उद्‌घाटन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून सभापती रमेश तवडकर उपस्थित राहणार आहेत.

यावेळी गोवा राज्य एससी एसटी आयोगाचे अध्यक्ष दीपक करमरकर, समजाकल्याण खात्याचे संचालक अजित पंचवडकर, ॲड. उपासो गावकर, नेहरू युवा केंद्राचे उपसंचालक कालिदास घाटवळ, कवळे बांदोडा महिला फेडरेशच्या अध्यक्ष अनुराधा काणकोणकर, जलस्त्रोत खात्याचे अतिरिक्त मुख्य अभियंते अंकुश गावकर, डॉ. मधू घोडकिरेकर, प्रा. देवानंद वेलिंगकर, फोंडा अग्मिशामक केंद्राचे स्टेशन अधिकारी सुनील मोरजकर, पत्रकार नरेंद्र तारी, तायाफ सिल्वेरा यांचाही यावेळी उपस्थिती असेल. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

**संपादकीय विभागाचा पत्ता :** दैनिक हेराल्ड, हेराल्ड इमारत, मुख्य टपाल कार्यालयाच्या मागे, सां टॉमे, पणजी गोवा, ४०३००१. **दूरध्वनी:** ०८३२-६७१८५१९ , **मडगाव:** ०८३२-२७१००१०, **फोंडा:** २३१६५१०, **मुंबई:** ०२२-२२८४०७०२, २२८४४९०८.

**ईमेल:** बातम्या अथवा पत्रके पाठवण्यासाठी news@dainikherald.com, क्रीडा बातम्यांसाठी sports@dainikherald.com, लेख पाठवण्यासाठी features@dainikherald.com, वाचकांच्या पत्रांसाठी editor@dainikherald.com, आणि जाहिरातींसाठी advt@herald-goa.com.

**सूचना:** संपादकीय वगळता दैनिक हेराल्डमध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखांतील आणि पत्रांतील मते संबंधित लेखकाची असून दैनिक हेराल्डचे संपादक, प्रकाशक आणि/अथवा मालक यांचा त्या मतांशी काहीही संबंध नाही. दैनिक हेराल्डमधील जाहिराती या जाहिरातदाराने दिलेल्या माहितीवर आधारित असतात. जाहिरातीतील मजकुराची वैधता दैनिक हेराल्ड तपासून पाहू शकत नाही. जाहिरातीतून उद्‌भवणाऱ्या कोणत्याही विषयाला जबाबदार दैनिक हेराल्ड नसून जाहिरातदारच आहे.